**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**

सचिव कार्यालय
दिनांकः- ४/७/२००८

**प्रति,**

मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.७ शनिवार दिनांक ५/७/२००८रोजी सकाळी -११.३०** वाजता स्थायी समिती कार्याल्यात खालील विषयावर विचार - विनीमय करण्यासाठी तातडीची सभा बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण सर्वांनी उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ७**

**सन-२००८-२००९**

**शनिवार दिनांक. ५/७/२००८ ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

१. मा.स्थायी समिती समिती सभा क्रमांक ५ सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.
२. अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील अचानक वस्ती बोहरी चाळ रेल्वे स्टेशन परिसर अंतर्गत नवीन इलेक्ट्रीक पोल टाकणे तारा ओढणे व १५० वॅट मेटल हालाईड स्ट्रीट लाईट फिटींग बसविणेचे कामास एस्टीमेट रूपये ५,३५,२९१/- चे खर्चास व सदरचे काम टेंडर पध्दतीने किंवा मजूर सहकारी संस्थे मार्फत करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.
३. अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील स्टेशन रोड दत्त मंदिर परिसर डॉ.पवार घर ते नन्नवरे घर ते मेन रोड पर्यत रस्ता डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये ४,४२,१५१/-खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.
४. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगार नाला पुलादरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे आर सी सी बंद पाईप गटर व रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.
५. अहमदनगर महानगरपालिकेचे आदर्श शाळा क्रमांक २६ मधील माणिक चौक येथील वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत अर्जदार श्री. उबेद शेख, चेअरमन डॉ. हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक -५ सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक २ ते ४ च्या प्रस्तावांच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**

सन २००८-२००९

विषय क्रमांक- १ शनिवार दिनांक ५/७/२००८

ठराव क्रमांक -१ शनिवार दिनांक ५/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ५ सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ५ सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी त्या बाबत आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. शिंदे द.बा.:- मागिल सभा दिनांक १६/६/२००८ रोजीचे सभेमध्ये ठराव क्रमांक १२ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बँक गॅरंटी मधून रक्कम रूपये १०,३६,५२०/- बॅन्केचे कर्ज हप्त्यापोटी भरणेस मंजूरी दिलेली आहे व अभिकर्ता संस्थेने दिनांक १७/६/२००८ पासून एकत्रीत बॅन्क खात्यामध्ये दैनंदिन भरणा करणे गरजेचे आहे. अन्यथा प्रशासनाने सदर बाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.अशा बाबत ठराव पारित केलेला आहे. सदरचे अभिकर्ता संस्थेस एकत्रीत बॅन्क खात्यामध्ये दैनंदिन भरणा करणेस दिनांक १७/७/२००८ अखेर पर्यत मुदत वाढ देण्यांत यावी. याप्रमाणे दुरूस्ती करून मागिल सभेचे कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.सौ. पवार सं.बा.:-अभिकर्ता संस्थेचे बॅन्क हमी मधून बॅन्केचे कर्ज हप्त्यापोटी सदर रक्कम देण्यांस तुर्त मंजूरी द्यावी मात्र त्यानंतर अभिकर्ता संस्थे कडून त्या बदल्यात आवश्यक ती हमी / तारण घेण्यांत यावे.त्यांना संयुक्त खात्यावर भरणा करणेस दिनांक १७/७/२००८ अखेर पर्यत मुदत वाढ देणे बाबत सदरचे ठराव क्रमांक १२ मध्ये दुरूस्ती करणेत यावी.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी.:- तसेच ठराव क्रमांक २ अन्वये कचराडेपो भोवती कंपाउन्ड वॉल बांधणे बाबत पारित केलेल्या ठरावा मध्ये स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक "श्री. संजय विधाटे व श्री. राजेंद्र जाधव, अहमदनगर यांचे निविदा रकमेपेक्षा २.९९% (दोन पूर्णांक नव्याण्णव शतांश टक्के) जादा व चालू दर सुचीच्या तुलनेत ०.१०% (शुन्य पुर्णांक दहा शतांश टक्के ) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर" या ऐवजी "श्री. संजय विधाटे , अहमदनगर यांचे निविदा दराने व चालू दरसुचीच्या तुलनेत ०.१०% (शुन्य पुर्णांक दहा शतांश टक्के ) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर" याप्रमाणे दुरूस्ती करावी.

मा.सौ. पवार सं.बा.:- त्याप्रमाणे ठराव क्रमांक दोन मध्ये दुरूस्ती करणेत यावी.मागिलसभे चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरूस्त्या सह मागिल सभा दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करावे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ५ सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीचे सभेमध्ये पारित केलेल्या ठराव क्रमांक २ व १२ या मध्ये खालील प्रमाणे दुरूस्त्या करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

ठराव क्रमांक १२ दिनांक १६/६/२००८ अन्वये "अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून रक्कम रूपये १०,३६,५२०/ ( रूपये दहा लाख छतीस हजार पांचशे वीस फक्त) बॅन्केचे कर्ज हप्त्यापोटी भरणेस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र अभिकर्ता संस्थेने दिनांक १७/६/२००८पासून एकत्रीत बॅन्क खात्या मध्ये दैनंदिन भरणा करणे गरजेचे आहे. अन्यथा प्रशासनाने सदर बाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी ऑफिस रिपोर्ट मंजुर,खर्च मंजूर" या ऐवजी "अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क हमीतून तुर्त रक्कम रूपये १०,३६,५२०/ ( रूपये दहा लाख छतीस हजार पांचशे वीस फक्त) बॅन्केचे कर्ज हप्त्यापोटी भरणेस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र त्यानंतर संबंधीत अभिकर्ता संस्थेकडून त्या बदल्यात आवश्यक ती हमी / तारण घेण्यांत यावे.अभिकर्ता संस्थेने दिनांक १७/७/२००८ पासून एकत्रीत बॅन्क खात्या मध्ये दैनंदिन भरणा करणे गरजेचे आहे. अन्यथा प्रशासनाने सदर बाबतीत योग्य ती कार्यवाही करावी ऑफिस रिपोर्ट मंजुर, खर्च मंजूर" या प्रमाणे-

तसेच ठराव क्रमांक २ दिनांक १६/६/२००८अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे बुरूडगांव सर्व्हे नं.३४ पै जागेमधील कचराडेपो भोवती १२ वा केंद्रीय वित्त आयोगा अंतर्गत कंपौन्ड वॉल बांधणे कमी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक "श्री.संजय विधाटे व श्री. राजेंद्र जाधव, अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा २.९९%(दोन पूर्णांक नव्याण्णव शतांश टक्के) जादा व चालू दर सुचीच्या तुलनेत ०.१०% (शुन्य पुर्णांक दहा शतांश टक्के) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर" या ऐवजी " श्री. संजय विधाटे अहमदनगर यांचे निविदा दराने व चालू दर सुचीच्या तुलनेत ०.१०%(शुन्य पुर्णांक दहा शतांश टक्के)कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे,ऑफिस रिपोर्ट मंजूर" याप्रमाणे दुरूस्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

वरील प्रमाणे दुरूस्त्यासह मा.स्थायी समिती सभा क्र.५ सोमवार दिनांक १६/६/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,<br>स्थायी समिती,<br>अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-२ शनिवार दिनांक ५/७/२००८
ठराव क्रमांक :-२ शनिवार दिनांक ५/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील अचानक वस्ती बोहरी चाळ, रेल्वे स्टेशन परिसर अंतर्गत नवीन इलेक्ट्रीक पोल टाकणे,तारा ओढणे व १५०वॅट मेटल हालाईड स्ट्रीट लाईट फिटींग बसविणेचे कामास एस्टीमेंट रूपये ५,३५,२९१/-चे खर्चास व सदरचे काम टेंडर पध्दतीने किंवा मजूर सहकारी संस्थे मार्फत करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.
**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-प्रभाग क्रमांक ८ मधील अचनाक वस्ती बोहरीचाळ रेल्वे स्टेशन परिसर, अंतर्गत नवीन इलेक्ट्रीकल पोल, तारा ओढणे व १५० वॅट मेटल हालाईड स्ट्रीट लाईट फिटींग बसविणे बाबत.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मधील मा.नगरसेवक श्री. विजय गव्हाळे यांची यादी प्राप्त झाली असुन यादीत विदयुत विभागामार्फत काम करणेकामी नगरसेवकांनी सुचविलेनुसार इलेक्ट्रीक सुपरवायझर यांनी समक्ष सर्व्हे केला आहे.सर्व्हेनुसार अचानक वाडी बोहरीचाळ रेल्वे स्टेशन परिसर, अहमदनगर अंतर्गत नवीन इलेक्ट्रीकल पोल, तारा ओढणे व १५० वॅट मेटल हालाईड स्ट्रीट लाईट फिटींग बसविणे आवश्यक आहे.सदरचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत करावयाचे आहे.

सदर कामाचे सन २००७-०८ वार्षिक टेंडर दर मंजूर नाहीत. काम टेंडर पध्दतीने किंवा मजूर सहकारी संस्थेमार्फत करावे लागेल. कामाचे अंदाजपत्रक सन २००७-०८ चे सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचे दरसुचीनुसार बनविले असून खर्च रक्कम अंदाजे रू. ५,३५,२९१/- ( अक्षरी पाच लाख पस्तीस हजार दोनशे एक्क्यान्नव मात्र) अपेक्षित आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील अचानक वस्ती बोहरी,चाळ रेल्वे स्टेशन परिसर अंतर्गत नवीन इलेक्ट्रीक पोल टाकणे, तारा ओढणे व १५० वॅट मेटल हालाईड स्ट्रीट लाईट फिटींग बसविणेचे कामास एस्टीमेंट रूपये ५,३५,२९१/- चे खर्चास व सदरचे काम टेंडर पध्दतीने किंवा मजूर सहकारी संस्थे मार्फत करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ८ मधील लाईटींग करणेस व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- सदरचे काम हे टेंडर पध्दतीने किंवा मजूर सहकारी संस्थे मार्फत करून घ्यावे याचा हा निर्णय सभेने घ्यावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- सदरचे काम हे कमी रक्कमेचे असल्याने व निविदा मागविणेस वेळ लागणार असलेने ते मजूर सोसायटी मार्फत करून घेणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ.पवार सं.बा.:- त्या प्रमाणे मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेत यावा. सदरचे काम मजूर सोसायटी मार्फत करून घेणेस मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील अचानक वस्ती बोहरी चाळ, रेल्वे स्टेशन परिसर अंतर्गत नवीन इलेक्ट्रीक पोल टाकणे, तारा ओढणे व १५०वॅट मेटल हालाईड स्ट्रीट लाईट फिटींग बसविणेचे कामास एस्टीमेंट रूपये ५,३५,२९१/-(रूपये पांच लाख पस्तीस हजार दोनशे एक्यान्नव फक्त)चे खर्चास व सदरचे काम मजूर सहकारी सोसायटी मार्फत करून घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-३ शनिवार दिनांक ५/७/२००८

ठराव क्रमांक :-३ शनिवार दिनांक ५/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील स्टेशन रोड दत्त मंदिर परिसर डॉ.पवार घर ते नन्नवरे घर ते मेन रोड पर्यत रस्ता डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये ४,४२,१५१/- खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-**प्रस्तावना-विषय-प्रभाग क्रमांक८मध्ये स्टेशनरोड दत्तमंदिर परिसर डॉ. पवार घर ते नन्नवरे घर ते मेनरोड पर्यत रस्ता डांबरीकरण करणे व पालवे घर ते वाघमारे घरापर्यत रस्ता कॅक्रीटीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.८ मध्ये स्टेशन रोड दत्त मंदिर परिसर डॉ.पवार घर ते नन्नवरे घर ते मेन रोड पर्यत रस्ता डांबरीकरण करणे व पालवे घर ते वाघमारे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे काम मा.नगरसेवक श्री. गव्हाळे विजय नाना यांनी इकडेस यादी देवून सदर काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतून करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी रस्ता खडीकरण झालेला आहे. सदर रस्ता डांबरीकरण व कॉक्रीटीकरण करणेचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनूसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ४,४२,१५१/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ८ मधील रस्ता डांबरीकरणेचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील स्टेशन रोड दत्त मंदिर परिसर डॉ.पवार घर ते नन्नवरे घर ते मेन रोड पर्यत रस्ता डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये ४,४२,१५१/- ( रूपये चार लाख बेचाळीस हजार एकशे एक्यावन्न फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-४ शनिवार दिनांक ५/७/२००८

ठराव क्रमांक :-४ शनिवार दिनांक ५/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगार नाला पुला दरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे आर.सी.सी बंद पाईप गटर व रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** -विषय-निविदा मंजुरी बाबत.

**कामाचे नांव :-** प्र.क्र. ५ मध्ये महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगार नाला पुला दरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे आर.सी.सी बंद पाईप गटर करणे व रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :-मा.आयुक्त साहेब यांनी दि.१६/०२/०८ अन्वये कामास मंजुरी.
२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- १५,९९,४०५/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- १५,९९,४०५/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८
६] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- रू.१५,६३,१८५/-
७] निविदा प्रसिध्दी तारीख :- २४/०४/२००८
८] निविदा विक्री कालावधी :- २८/०४/२००८ ते ०६/०५/२००८
९] निविदा स्विकारण्याची तारीख :- ९/०५/२००८
१०] निविदा उघडण्याची तारीख :- १२/०५/२००८
११] कामाची मुदत :- ४महिने
११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. एम.व्ही. दराडे | ५० % जादा |
| २ | श्री.ए.सी. कोठारी | ३५% जादा |
| ३ | श्री.विजय म्हस्के | ३४ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री.विजय म्हस्के यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ३४ % जादा आहे. कमी दराचे निविदा धारकास दि.२२/५/०८ रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, त्यांनी निविदा दरापेक्षा २०.५०% जादा दराने काम करणेचे कळविलेनुसार सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ३०/५/०८ ठेवला असता छाननी समितीच्या बैठकीत सदर काम ठेकेदारस ८.८० %जादा दराने देणेची शिफारस करण्यात आली आहे. ( स.न. ०७-०८ चे दरसुची पेक्षा जादा)

संबंधीत ठेकेदारास मा.आयुक्त साहेब यांचे शेरानुसार पुनश्च समक्ष वाटाघाटीसाठी बोलविले असता सदर ठेकेदाराने निविदा दरापेक्षा ८.५% जादा दराने काम करणेस मान्यता दिलेली आहे. संबंधीत ठेकेदार श्री. विजय म्हस्के, अहमदनगर यांनी दिलेल्या सुधारित देकारानुसार सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. १८,७८,४९३/- |
| २ | चालु दरसुची सन . ०७-०८अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू १७,३१,३३०/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक (१-२) | रू. १,४७,१६३/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ X १००) / २ | ८.५% जादा |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

त्यानुसार सन २००७-०८ चे सुधारित दरसुचीनुसार करता ठेकेदाराचा देकार ८.५% जादा येत आहे. तरी उपरोक्त निविदा मा.स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता करितां यांचा अहवाल असे दि.२७/६/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ५ मधील रस्त्याचे खडीकरण व आर.सी.सी. पाईप गटर करणेचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- कमीचे दरास मंजूर देण्यांत यावी.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगार नाला पुला दरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे, आर.सी.सी बंद पाईप गटर व रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. विजय म्हस्के यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या सुधारित देकाराप्रमाणे सन २००७-२००८ चे सुधारित दरसुची नुसार ८.५% ( आठ पूर्णांक पांच दशांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :- ५ शनिवार दिनांक ५/७/२००८

ठराव क्रमांक :- ५ शनिवार दिनांक ५/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आदर्श शाळा क्रमांक-२६ माणिक चौक येथील वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत अर्जदार श्री. उबेद शेख चेअरमन, डॉ.हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :- विषय**- डॉ.हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशच्या आदर्श शाळा वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत.

**संदर्भ** :-श्री. उबेद शेख चेअरमन डॉ. हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन अहमद मेमोरिअल फौन्डेशन अहमदनगर यांचेकडील पत्र.

महोदय,

महानगरपालिका शाळा क्रमांक-२६ माणिक चौक अहमदनगर येथील एक वर्ग खोली आपलेकडील ठरावा अन्वये अर्जदारांस वापरण्यास देण्यांत आलेली आहे. सदर वर्ग खोलीस सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे आकारून आलेले आहे. तथापी सदर अर्जदारांनी नाममात्र भाडे आकारून मिळणे बाबत अर्ज केलेला आहे. सदर अर्जावरून मा.आयुक्त साहेब यांचेकडे टिपणी सादर केली असता क्रमांक-१९२ दिनांक ९/५/२००८ अन्वये आपणांकडे मजूरीसाठी पाठविणेबाबत आदेश झालेले आहे.

तरी टिपणी व अर्जदारांकडील पत्र व भाडे आकारणी तक्ता ( मनपा वसुली विभाग) मा.स्थायी समिती ठराव सोबत सविनय सादर करीत आहे.

आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रशासनाधिकारी, शिक्षण मंडळ,मनपा यांचा अहवाल असे दि. १९/५/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी यांना सभे मध्ये बोलावण्यांत यावे.

श्री. पठाण शिक्षण मंडळ सुपरवायझर हे सभेमध्ये उपस्थित झाले.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

श्री. पठाण,शिक्षण मंडळ सु. :- सन २००४ साली मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेल्या ठरावा नुसार आदर्श शाळा येथील एक वर्ग खोली श्री. उबेद शेख चेअरमन डॉ हाजी शेख अहमद मेमोरीअल फौन्डेशन यांना बालवाडी, कॉम्प्युटर एज्युकेशन करिता, वर्ग खोलीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठरवून येई पर्यत किमान दरमहा भाडे रूपये एक हजार आकारून भाडे तत्वावर दिलेली आहे.

मा. श्री. मैड स.ब.:- सदर खोलीस सार्व.बांध. विभागाने किती भाडे आकरले आहे.

श्री. पठाण, शिक्षण मंडळ सु.:- सदर खोलीस सार्वजनिक बांधकाम विभागाने दरमहा रूपये ५२१/- प्रमाणे भाडे आकारणी केलेली आहे.

मा.श्री.मैड स.ब.:-अशा प्रकारे शिक्षण मंडळाकडील शाळांच्या किती खोल्या भाडे तत्वावर दिलेल्या आहेत.त्यांचे कडेस किती थकबाकी आहे.

श्री. पठाण,शिक्षण मंडळ सु. :- अशा एकूण ८३ खोल्या भाडे तत्वावर दिलेल्या असुन त्याचे कडेस रूपये सेहेचाळीस लाख दोन हजार चाळीस फक्त थकबाकी आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- नाममात्र भाडे आकारणी बाबत प्रस्ताव आहे अशा प्रकारे आपण ठरवून आलेली भाडे आकरणी नाममात्र केली तर, त्या प्रमाणे सर्वच त्र्याऐंशी खोल्यांचे भाडे आकारणी कमी करणे बाबत संबंधीत आपले कडेस अर्ज करतील.

मा.श्री. मैड स.ब.:- सदर खोल्यांची भाडे वसुली अद्याप पर्यत का केली नाही. वसुली विभाग प्रमुखांना सभेत बोलवावे.

मा.सभापती साहेब :- वसुली प्रमुखांना बोलवावे.

त्याप्रमाणे श्री. परशरामी एस.एस. वसुली अधिक्षक हे सभेमध्ये उपस्थित झाले.

मा.सभापती साहेब :- सदर शाळांचे वर्ग खोल्यांचे थकबाकीचे वसुली बाबत काय?

मा.श्री. मैड स.ब. :- सदरची थकबाकी वसुल करावी अन्यथा वर्ग खोल्या म.न.पा.चे ताब्यात घेणेची कार्यवाही करावी. नाममात्र भाडे आकरणी करणेत येउ नये.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.सर्वसाधारण सभे मध्ये सदर वर्ग खोल्याचे थकबाकी वसुली संबंधी चर्चा होउन म.न.पा अधिनियमानुसार सदर प्रकारणी पुढील कार्यवाही करणेबाबत ठरलेले आहे.

मा.सभापती साहेब :- सर्व साधारण सभेचे निर्णयानुसार भाडे वसुलीची कार्यवाही चालू आहे. त्याप्रमाणे कार्यवाही नंतर सदर प्रकरणी निर्णय घेउऋ

मा.श्री. शिंदे द.बा. व मा.श्री. मैड स.ब.:- वॉर्डामधील नागरिकांचे पाणी पट्टी थकली तर आपण नळ कनेक्शन तोडणेची कार्यवाही करतो या प्रकरणी काय कर्यवाही केली.

मा.सौ. दिघे वि.रा.:- नळ कनेक्शन तोडते वेळी नगरसेवकांचे ही ते काही ऐकत नाहीत.

वसुली अधिक्षक श्री.परशरामी एस.एस.:- सदर वर्ग खोल्यांचे थकबाकीची बीले संबंधीतांना दिलेली आहेत डिमांड नोटीसा काढणेचे काम चालू आहे.

मा.श्री.शिंदे द.बा.:- नागरिकांकडेस पाणी पट्टीची थकबाकी असल्यास ती वसुल करतांना नळ कनेक्शन तोडले जाते मात्र हया प्रकरणी ठोस कार्यवाही होत नाही. सदर शाळांचे वर्ग खोल्याचे भाडे वसुली बाबतची माहिती पूर्वीचे वसुली अधिक्षकच देउ शकतील.

मा.सभापती साहेब :-त्यांना सभेमध्ये बोलावण्यांत यावे.

त्याप्रमाणे जकात अधिक्षक श्री.पवळे एन.एम. हे सभेमध्ये हजर झाले.

मा.श्री. शिंदे द.बा.:- शाळांच्या वर्ग खोल्याची थकबाकी सेहेचाळीस लाख आहे ती वसुल का केली नाही.

जकात अधिक्षक श्री.पवळे एन.एम.:- सदर शैक्षणिक संस्थांना दिलेल्या खोल्यांचे भाडे ते शाळांना अनुदान मिळत नाही म्हणून भरत नाहीत.असे ते सांगतात त्याचे अनुदानातून सदरचे भाडे वसुली बाबत मा.प्रशासनाधिकारी शिक्षण विभाग,जिल्हा परिषद,मा.शासन यांना कळविण्यांत आलेले आहे.परंतु सदर संस्थांना अनुदान नसलेने ते वसुल करता येत नाही असे सांगतात.

मा.श्री. मैड स.ब.:- हि थकबाकी कधी पासून आहे.

जकात अधिक्षक श्री.पवळे एन.एम. :- तीन वर्षापासूनची आहे. सदर वर्ग खोल्या हया शिक्षण मंडळानेच भाडे तत्वावर दिलेल्या आहेत.

मा.श्री. मैड स.ब.:- सदरचे सेहेचाळीस लाखाचे वसुलीची कार्यवाही आपण का करत नाही.

जकात अधिक्षक श्री.पवळे एन.एम.:- सदर वर्ग खोल्यांचे थकबाकी वसुली संबंधी कार्यवाही सुरू केलेली आहे. त्यांना थकबाकीची बीले दिले नंतर डिमांड नोटीस देउन वॉरंट काढणेत येईल. तद्नंतर प्रोसिजर प्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-म.न.पा.चे नियमानुसार थकबाकीची बीले देउन, दहा टक्के दंड वसुलीची डिमांड नोटीस दिले नंतर वॉरंट काढणेत यावे.थकबाकी वसुलीची प्रोसिजर प्रमाणे यावर्षी अखेर पर्यत ही कार्यवाही पूर्ण करावी. संपूर्ण थकबाकी वसुल करावी.

मा.श्री. मैड स.ब.:- पाणी पट्टीचे दहा हजारांचे वसुली साठी नागरिकांची अडवणूक केली जाते. या प्रकरणी कुनाचाही हस्तक्षेप होउ न देता सेहेचाळीस लाखाचे थकबाकीची वसुली काळजी पूवर्क करावी.

मा.श्री. शिंदे द.बा. :- सदर वर्ग खोल्यांचे थकबाकी वसुली बाबत कार्यवाही चालु असलेने सदरचा प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- पुढील सभेत निर्णयासाठी घ्यावा.

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरण पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेणेत यावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आदर्श शाळा क्रमांक-२६ माणिक चौक येथील वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत अर्जदार श्री. उबेद शेख चेअरमन, डॉ.हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयासाठी पुढील सभेमध्ये घेणेत यावा.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.